INDIA'S LARGEST CONTAINER PORT

जनेप प्राधिकरण JNPA

CONNECTED. COMMITED. TRUSTED

# JNPA leadership explores new dedicated freight corridor infrastructure to speed up container evacuation

*Chairman Gaurav Dayal and Deputy Chairman Ravish Singh inspect strategic railway stations and logistics hubs to enhance port connectivity to Bhiwandi.*

**Mumbai, August 30th, 2026:** In a major push toward optimizing cargo logistics and accelerating container evacuation from the port, Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) Chairman Mr. Gaurav Dayal, IAS, along with Deputy Chairman Mr. Ravish Singh, IRTS, and senior port officials, conducted a comprehensive field inspection of key railway infrastructure along the Dedicated Freight Corridor (DFC) route.

The delegation visited the newly developed Kharbhav Railway Station to evaluate operational synergies for utilizing the DFC line. The strategic integration of Kharbhav is expected to streamline and expedite the movement of containerized cargo directly from JNPA to the major consumption and distribution hubs in Bhiwandi, significantly cutting down transit times and easing road congestion.

Following the inspection at Kharbhav, the senior leadership team toured the prominent Bhiwandi Warehousing Hub to gauge supply chain capacity, last-mile logistics efficiency, and storage readiness. The site visit concluded with an inspection of the New Nilanje Railway Station, assessing its potential to serve as an additional vital freight node within the expanding rail-freight ecosystem.

Speaking on the operational visit, Mr. Gaurav Dayal, Chairman, JNPA, stated: "Efficient multimodal connectivity is the backbone of modern port operations. By maximizing the potential of the Dedicated Freight Corridor through strategic rail nodes like Kharbhav and Nilanje, JNPA aims to offer seamless, faster, and environmentally sustainable container evacuation routes directly to key commercial clusters like Bhiwandi."

Mr. Ravish Singh, Deputy Chairman, JNPA, added: "Transitioning a higher share of container traffic from road to rail is crucial for reducing logistics costs and turnaround times. Our joint assessments today reinforce our commitment to building resilient hinterland connectivity that supports the growth of trade and industry."

This initiative aligns with JNPA's broader mandate under the PM Gati Shakti National Master Plan to drive integrated infrastructure development, boost operational efficiency, and cement its position as India's premier container port.

*****

**About Jawaharlal Nehru Port Authority (JNPA):**

The Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) is one of India's premier container-handling ports and a key gateway for the country's EXIM trade.
JNPA currently operates five container terminals — NSFT, NSICT, NSIGT, BMCT and APMT. The port also has a shallow water berth for general cargo, operated by NSDT. Its liquid cargo facilities include a terminal managed by the BPCL-IOCL consortium and an additional liquid cargo terminal developed by JNPA and operated by M/s JSW-JNPT Liquid Terminal Pvt. Ltd. The port's coastal berth further strengthens maritime connectivity with other Indian ports and supports the growth of coastal cargo and container movement.

Spread across 277 hectares, JNPA also operates a strategically located multi-product Special Economic Zone (SEZ) equipped with modern infrastructure and facilities to support export-oriented industries and promote trade and investment.

Looking ahead, JNPA is developing the Vadhvan Port, an all-weather, deep-draft, greenfield port in Maharashtra and the 13th Major Port of India.

**For media enquiries, please contact:**
Ambika Singh |Sr. Manager (Marketing), JNPA
+91 9920372677|ambikasingh@jnport.gov.in

---

# कंटेनर जलदगतीने बाहेर पाठवण्यासाठी जेएनपीए नेतृत्वाकडून डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरच्या पायाभूत सुविधांची पाहणी

*अध्यक्ष गौरव दयाल आणि उपाध्यक्ष रवीश सिंह यांच्याकडून बंदराची भिवंडीशी कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करण्यासाठी महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांची व लॉजिस्टिक हबची पाहणी*

**मुंबई, 30 ऑगस्ट 2026:** बंदरातील मालवाहतूक व्यवस्थेला अधिक कार्यक्षम बनविण्यासोबतच कंटेनरची जलदगतीने वाहतूक सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाचे (जेएनपीए) अध्यक्ष श्री. गौरव दयाल, भा.प्र.से. आणि उपाध्यक्ष श्री. रवीश सिंह, भा.रे.वा.से. यांनी वरिष्ठ बंदर अधिकाऱ्यांसह डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर (डीएफसी) वरील महत्त्वाच्या रेल्वे पायाभूत सुविधांची सविस्तर पाहणी केली.

या शिष्टमंडळाने नव्याने विकसित करण्यात आलेल्या खारभव रेल्वे स्थानकाला भेट देऊन डीएफसीच्या वापरासाठी आवश्यक कार्यात्मक समन्वयाची पाहणी केली. खारभव स्थानकाचे धोरणात्मक एकत्रीकरण झाल्यामुळे जेएनपीएमधून भिवंडीतील प्रमुख उपभोग व वितरण केंद्रांकडे कंटेनरयुक्त मालाची वाहतूक अधिक सुरळीत आणि जलद होण्यास मदत होईल. परिणामी, मालाच्या वाहतुकीस लागणारा वेळ कमी होण्यासोबतच रस्त्यांवरील वाहतूक कोंडीही कमी होईल.

खारभव येथील पाहणीनंतर, वरिष्ठ नेतृत्वाच्या पथकाने भिवंडीतील प्रमुख वेअरहाऊसिंग हबला भेट देऊन पुरवठा साखळीची क्षमता, लास्ट-माईल लॉजिस्टिक्सची कार्यक्षमता आणि साठवणुकीची तयारी यांचा आढावा घेतला. या पाहणीचा समारोप नवीन निळंजे रेल्वे स्थानकाच्या पाहणीने झाला. विस्तारत असलेल्या रेल्वे मालवाहतूक व्यवस्थेत हे स्थानक अतिरिक्त महत्त्वाचे मालवाहतूक केंद्र म्हणून कितपत उपयुक्त ठरू शकते, याचेही यावेळी मूल्यांकन करण्यात आले.

या पाहणीदरम्यान बोलताना जेएनपीएचे अध्यक्ष श्री. गौरव दयाल म्हणाले, “आधुनिक बंदरांच्या कार्यक्षम संचालनासाठी प्रभावी मल्टिमोडल कनेक्टिव्हिटी अत्यंत महत्त्वाची आहे. खारभव आणि निळंजे यांसारख्या धोरणात्मक रेल्वे केंद्रांच्या माध्यमातून डीएफसीचा अधिकाधिक वापर करून, भिवंडीसारख्या प्रमुख व्यावसायिक केंद्रांपर्यंत कंटेनरची वाहतूक अधिक सुरळीत, जलद आणि पर्यावरणपूरक पद्धतीने करण्यासाठी जेएनपीए प्रयत्नशील आहे.”

या वेळी जेएनपीएचे उपाध्यक्ष श्री. रवीश सिंह म्हणाले, “कंटेनर वाहतुकीतील अधिकाधिक हिस्सा रस्ते मार्गावरून रेल्वेकडे वळवणे हे लॉजिस्टिक्सचा खर्च आणि वाहतुकीस लागणारा वेळ कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आज करण्यात आलेल्या संयुक्त पाहणीमुळे व्यापार आणि उद्योगाच्या वाढीला पाठबळ देणारी सक्षम व विश्वासार्ह अंतर्देशीय वाहतूक जोडणी विकसित करण्याच्या आमच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळाले आहे.”

हा उपक्रम पंतप्रधान गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन अंतर्गत जेएनपीएच्या व्यापक उद्दिष्टांशी सुसंगत असून, एकात्मिक पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देणे, कार्यक्षमतेत वाढ करणे आणि भारतातील आघाडीचे कंटेनर बंदर म्हणून जेएनपीएचे स्थान अधिक भक्कम करणे, या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

*****

**जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) विषयी माहिती:**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जनेप प्राधिकरण) हे भारतातील प्रमुख कंटेनर हाताळणी बंदरांपैकी एक आहे. 26 मे 1989 रोजी स्थापना झाल्यापासून, जनेप प्राधिकरण एक बल्क कार्गो टर्मिनलवरून देशातील प्रमुख कंटेनर बंदरात रूपांतरित झाले आहे.

सध्या, जनेप प्राधिकरण पाच कंटेनर टर्मिनल्स चालवते एन एस एफ टी, एन एस आय सी टी, एन एस आय जी टी, बी एम सी टी आणि ए पी एम टी. न्हावा शेवा डिस्ट्रिब्युशन टर्मिनल प्रा. लि. (एनएसडीटी) द्वारे संचालित सामान्य मालासाठी एक उथळ पाण्याचा बर्थ देखील आहे. जनेप प्राधिकरण पोर्टवर उपस्थित असलेले लिक्विड कार्गो टर्मिनल बीपीसीएल आयओसीएल कन्सोर्टियम द्वारे व्यवस्थापित केले जाते आणि जेएनपीएने विकसित केलेले अतिरिक्त लिक्विड कार्गो टर्मिनल मेसर्स जेएसडब्ल्यू - जेएनपीटी लिक्विड टर्मिनल प्रा. लि. द्वारे चालवले जाते. या व्यतिरिक्त, नव्याने बांधलेला किनारी धक्का इतर भारतीय बंदरांना जोडतो आणि किनारपट्टीवरील कंटेनरची वाहतूक वाढवते.

277 हेक्टर जमिनीवर वसलेले, जनेप प्राधिकरण भारतातील निर्यात-केंद्रित उद्योगांना चालना देण्यासाठी, अत्याधुनिक पायाभूत सुविधांसह, काळजी पूर्वक डिझाइन केलेले बहुउत्पादक विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) देखील चालवते.

जेएनपीए वाढवण येथे एक सर्व-हवामान, डीप ड्राफ्ट, ग्रीनफिल्ड बंदर विकसित करत आहे, जे महाराष्ट्रातील भारताचे १३वे मोठे बंदर असेल. हे जागतिक स्तरावरील सर्वोत्कृष्ठ १० बंदरांमध्ये स्थान मिळवणार आहे आणि स्थापनेपासून १००% हरित बंदर असेल.

**मीडिया चौकशीसाठी, कृपया संपर्क साधा:**

अंबिका सिंग | सीनियर मॅनेजर (मार्केटिंग), जनेप प्राधिकरण

मोबाईल क्रमांक: +919920372677 | ईमेल: ambikasingh@jnport.gov.in

**अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाइट आणि सोशल मीडियाला भेट द्या:**

जेएन पोर्ट : www.jnport.gov.in | लिंक्डइन: JNPA- Jawaharlal Nehru Port Authority

एक्स: @JNPort | इंस्टाग्राम: @jnpaport | फेसबुक: @JNPA